**दिनांक** 01/10/2025

**प्रेसनोट**

## अवैध व्यवसाय विरोधी अभियान - 05

### नांदेड परिक्षेत्रात सप्टेंबर महिन्यात आणखी 1190 कारवाया, 08 कोटी रुपयांचा मुद्येमाल जप्त

परिक्षेत्रात सुरु असलेल्या अवैध दारु, मटका, जुगार, ऑनलाईन लॉटरी, क्रिकेट बेटिंग, गुटखा, अंमली पदार्थ, वेश्याव्यवसाय, वाळु उपसा व वाहतुक, अवैध प्रवासी वाहतूक इत्यादींना आळा घालण्यासाठी, पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी दिनांक 1 मे पासून नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसाय विरोधी अभियान सुरु केले आहे.

पोलीसांनी, नांदेड परिक्षेत्रात मे, जुन, जुलै व ऑगस्ट महिन्यात राबविलेल्या अवैध व्यवसाय विरोधी अभियान - 1, अभियान -2, अभियान - 3 व अभियान - 4 दरम्यान, अवैध व्यवसायांत गुंतलेल्या 7696 इसमांचे विरुध्द एकूण 6784 केसेस करुन 33,44,56,249/- रुपयांचा मुद्येमाल हस्तगत केला होता.

सदर कारवाईनंतर, परिक्षेत्रात, सप्टेंबर महिन्यात अवैध व्यवसाय विरोधी अभियान - 5 राबविण्यात आले होते. सदर अभियाना दरम्यान, नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसायिकांविरुध्द आणखी 1190 केसेस करुन त्यांच्याकडून 08 कोटीहून अधिक रक्कमेचा मुद्येमाल हस्तगत करण्यात आला आहे. सप्टेंबर महिन्यात परिक्षेत्रातील चारही जिल्हयांनी केलेली कामगिरी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | जिल्हा | एकूण केसेस | आरोपी संख्या | जप्त मुद्येमाल |
|---|---|---|---|---|
| 1. | नांदेड | 271 | 464 | 6,65,28,911 |
| 2. | परभणी | 239 | 320 | 64,09,634 |
| 3. | लातूर | 408 | 466 | 55,54,780 |
| 4. | हिंगोली | 272 | 299 | 28,92,435 |
| | **एकूण** | 1190 | 1549 | 8,13,85,760 |

उपरोक्त कारवाई दरम्यान, नांदेड जिल्हयातील पोस्टे देगलूर यांनी 2,83,000/- रुपयांचा गांजा जप्त करून चांगली कामगिरी केली आहे. सदर कामगिरी बाबत, पोलीस उप महानिरीक्षक यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

(67) **अवैध व्यवसायिक हद्यपार, तर एकावर MPDA अंतर्गत कारवाई** :

आजवर राबविण्यात आलेल्या पाच अभियानांतर्गत, अवैध व्यवसायांत गुंतलेल्या (67) इसमांना परभणी, लातूर व हिंगोली पोलीसांनी हद्यपार केले असुन, नांदेड पोलीसांनी हातभटटी दारु व्यवसायाशी निगडित एका इसमास (MPDA) कायद्याखाली एक वर्षासाठी स्थानबध्द केले असुन, दिनांक 17/06/2025 रोजी त्याची रवानगी छत्रपती संभाजीनगर कारागृहात करण्यात आली आहे.

दिनांक 1 ऑक्टोबर पासून परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी **अवैध व्यवसाय विरोधी अभियान** - 6 राबविण्यात येत असून, संपुर्ण ऑक्टोबर महिन्यात हे अभियान सुरु राहील. सदर मोहिमेदरम्यान, गुटखा, रेती, अंमली पदार्थ, मटका व जुगार यांच्या निर्मूलनावर विशेष भर देण्यात येणार आहे.

**हेल्पलाईन ' खबर '** :

नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांच्या निर्मूलनासाठी ' **खबर** ' ही हेल्पलाईन नव्याने सुरु करण्यात आली असून त्याचा क्रमांक 91 50 100 100 असा असून सदर हेल्पलाईनवर नागरिक कॉल अथवा व्हॉटसअॅप मेसेज करुन, आपली माहिती/तक्रार सादर करू शकतील.

आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, नागरिकांनी नजीकच्या पोलीस ठाण्यास अथवा पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाच्या **nandedrange.mahapolice.gov.in** या संकेतस्थळावर किंवा 91 50 100 100 या हेल्पलाईनवर कळवून अशा अवैध व्यवसायांचा बिमोड करण्यासाठी आपला हातभार लावावा, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी केले आहे.

कार्यालय पोलीस उप महानिरीक्षक,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड